



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले.

# विद्यापीठात स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले.

विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते स्वा. सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. प्रतिमा पवार, शिवाजी विद्यापीठ रिसर्च फाउंडेशनचे डॉ. प्रकाश राऊत, डॉ. प्रकाश गुरव, डॉ. गिरीष कुलकर्णी, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. पी.एस. पांडव, अमोल कुलकर्णी यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.




कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. शिवाजी जाधव आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी

कोल्हापूर : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांना जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते स्वा. सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. प्रतिमा पवार आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात स्वातंत्र्यवीर सावरकरांना अभिवादन

**कोल्हापूर :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त मंगळवारी शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते स्वा. सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, डॉ. प्रकाश गायकवाड, डॉ. धनंजय सुतार, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. प्रकाश राऊत, डॉ. प्रकाश गुरव, डॉ. गिरीष कुलकर्णी, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. पी. एस. पांडव, अमोल कुलकर्णी यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# शिवाजी विद्यापीठात स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती

**कोल्हापूर :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. धनंजय सुतार, राष्ट्रीय सेवायोजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, डॉ. रामचंद्र पवार, डॉ. प्रतिमा पवार, डॉ. प्रकाश राऊत, डॉ. प्रकाश गुरव, डॉ. गिरीष कुलकर्णी, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. पी. एस. पांडव, अमोल कुलकर्णी आदी उपस्थित होते.

# विद्यापीठात स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

कोल्हापूर : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांना अभिवादन करण्यात आले. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालण्यात आला. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड, बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ.. धनंजय सुतार, राष्ट्रीय सेवा योजना संचालक डॉ. तानाजी चौगुले, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, डॉ. प्रतिमा पवार, शिवाजी विद्यापीठ रिसर्च फाउंडेशनचे डॉ. प्रकाश राऊत, डॉ. प्रकाश गुरव, डॉ. गिरीष कुलकर्णी, डॉ. संभाजी शिंदे, डॉ. मच्छिंद्र गोफणे, डॉ. पी. एस. पांडव, अमोल कुलकर्णी यांच्यासह शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# फिल्म मेकिंग अभ्यासक्रमामागची प्रेरणा भालकरांचीच

## डॉ. व्ही. एन. शिंदे : एस. निंबाळकर यांच्यासह मान्यवरांना भालकर्स पुरस्कार प्रदान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : 'शिवाजी विद्यापीठामध्ये फिल्म मेकिंग पदवी अभ्यासक्रम सुरू करण्यामागे नकळतपणे चित्रपट दिग्दर्शक यशवंत भालकर हेच प्रेरणास्त्रोत ठरले,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. संगीतसूर्य केशवराव भोसले नाट्यगृहात यशवंत भालकर फाउंडेशन संचालित भालकर्स कला अकादमीतर्फे आज सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत व्यक्तींना डॉ. शिंदे यांच्या हस्ते पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी डॉ. शिंदे यांच्या हस्ते चित्रकार एस. निंबाळकर यांना कलामहर्षी बाबूराव पेंटर स्मृती कलासेवा पुरस्कार, तर



कोल्हापूर : भालकर्स पुरस्कार समारंभात एस.निंबाळकर, सदानंद सुर्यवंशी, उदय कुलकर्णी, आनंद कुलकर्णी, प्रकाश साळोखे, सागर बगाडे यांचा कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देवून गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित रेखा भालकर, संग्राम भालकर, संदीप भालकर, सपना जाधव-भालकर, संदीप जाधव, अलोक जत्राटकर आदी उपस्थित होते. (मोहन मेस्त्री : सकाळ छायाचित्रसेवा )

रंगभूषाकार सदानंद सूर्यवंशी यांना चित्रतपस्वी भालजी पेंढारकर स्मृती चित्रसेवा पुरस्कार, नाट्यवितरक आनंद कुलकर्णी यांचा मदन मोहन लोहिया स्मृती नाट्यसेवा पुरस्कार देऊन व ज्येष्ठ वादक प्रकाश साळोखे यांचा संगीतकार यशवंत देव स्मृती संगीतसेवा पुरस्कार, ज्येष्ठ पत्रकार उदय कुलकर्णी यांचा लक्ष्मण महालिंगा भालकर स्मृती सामाजिक लक्षरत्न प्रेरणा पुरस्कार आणि नृत्य दिग्दर्शक सागर बगाडे यांचा मास्टरजी सुबल सरकार स्मृती नृत्यसेवा पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.

डॉ. शिंदे म्हणाले, 'यशवंत भालकर हे नाव माझ्यासमोर आले तरी माझ्यात वेगळी ऊर्जा निर्माण होते. ते सिनेट सदस्य म्हणून पाच वर्षांचा कालावधी पूर्ण करतील, तोपर्यंत शिवाजी विद्यापीठात फिल्म मेकिंगसंबंधी नाट्य विभागात वेगळा परफॉर्मिंग आर्टसंबंधी एक चांगला कोर्स येईल, असे वाटत होते. मात्र, ते घडू शकले नाही. शिवाजी विद्यापीठाने यंदापासून बी. ए. फिल्म मेकिंग हा पदवी प्रमाणपत्र कोर्स सुरू केला. कळत नकळत त्यामागची प्रेरणा यशवंत भालकर यांचीच आहे.'

स्वागत संग्राम भालकर यांनी केले. आभार संस्थेचे अध्यक्ष संदीप भालकर यांनी मानले. यावेळी मिलिंद अष्टेकर, प्राचार्य एस. एस. चव्हाण, डॉ. आलोक जत्राटकर, रेखा भालकर, संदीप जाधव, संस्थेच्या उपाध्यक्षा सपना जाधव-भालकर आदी मान्यवर उपस्थित होते.

### छत्रपती शिवाजी पुतळ्याचा इतिहास ...

छत्रपती शिवाजी चौकात स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी १९२९ ला ब्रिटिश गव्हर्नर विल्सन यांचा पुतळा उभा केला. दहा ऑक्टोबर १९४२ ला भगिरथीबाई तांबट, जयाबाई हावरे या दोन स्वातंत्र्य सौदामिनींनी या पुतळ्यावर डांबर फेकून पुतळा विद्रुप केला. पुढे हा पुतळा १३ सप्टेंबर १९४३ ला शामराव पाटील यांच्यासह स्वातंत्र्यसेनानी फोडला. त्यानंतर १३ मे १९४५ ला शिवाजी महाराजांच्या पुतळा पुन्हा उभा केला. हा इतिहास आजच्या पिढीलाही कळण्यासाठी भालकर्स अकादमीच्या कलाकारांनी उपस्थितांना भावणारी लघुनाटिका सादर केली.



भोवताल

# धरणे भरूनही पाणीटंचाई!


डॉ. व्ही.एन. शिंदे

पाऊस पडतो. पूर येतो. धरणे भरतात. तरीही डिसेंबर जवळ येताच पाण्याची टंचाई सुरू होते. काही गावात तर पावसाळा सुरू असतानाच पाण्याची टंचाई सुरू होते. गावोगावी पाण्यासाठी लोकांचे हाल कसे होतात याच्या बातम्या वाहिन्यांवर दाखवल्या जातात. पावसाळ्यात पुराच्या आणि हिवाळा-उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या बातम्या, महाराष्ट्राच्या प्राक्तनात लिहिल्या आहेत. हे का घडते, कसे घडते, याचा आपण साकल्याने विचार करण्याची गरज आहे. यामागचा भूगोल आणि विज्ञान समजून घेणे आणि निदान यापुढे तरी विवेकाने जगणे गरजेचे आहे.

पृथ्वीवर दरवर्षी पाऊस पडतो. जगभरात सरासरी पडणाऱ्या पावसाच्या प्रमाणापेक्षा दोन इंच जास्त म्हणजेच ४३ इंच पाऊस भारतात पडतो. भारताच्या सरासरीपेक्षा पाच इंच जास्त पाऊस महाराष्ट्रात पडतो. आमची धरणे काठोकाठ भरतात. उलटून वाहू लागतात. तरीही उन्हाळ्यात पाण्याची टंचाई निर्माण होते. याचे पहिले कारण म्हणजे महाराष्ट्रात पावसाचे पुरेसे पाणी साठवू शकेल अशी व्यवस्था अद्याप निर्माण करू शकलो नाही. महाराष्ट्रात १८२१ धरणे आहेत. यात १७ मोठी धरणे, १७३ मध्यम आणि १६३१ छोटे तलाव आहेत. यामध्ये पडलेल्या पावसाच्या पाण्यापैकी केवळ सहा टक्के पाणी साठवले जाते. पावसाचे १०० लिटर पाणी जमिनीवर उपलब्ध होत असल्यास, त्यापैकी केवळ सहा लिटर पाणी तलावात साठवले जाते. उरलेल्या पाण्यापैकी केवळ दहा लिटर पाण्याचे पुनर्भरण होते, म्हणजे जमिनीत मुरते. काही भागात सात, तर काही भागात ३० टक्के पाण्याची वाफ होते. म्हणजे ७ ते ३० लिटर पाण्याची वाफ होते. काही वर्षांपूर्वी हे प्रमाण १७ टक्के इतके होते. नद्यांच्या प्रवाहातून वाहत जाऊन १०० लिटर पाण्यापैकी ६७ लिटर पाणी समुद्राला मिळते. हे समुद्राला मिळणारे पाणी अडवायला पाहिजे आणि ते पाणी जमिनीत जिरवायला पाहिजे.

महाराष्ट्रातील जमिनीखाली बेसॉल्ट खडकाचा थर येतो. बेसॉल्ट खडकामध्ये लोह आणि मॅग्नेशियमचे प्रमाण जास्त आहे. इतर खडकाच्या तुलनेत सिलिकाचे प्रमाण कमी असते. हा खडक ज्वालामुखीच्या थरातून तयार होतो. यामध्ये भेगा कमी असतात. त्यामुळे या खडकामध्ये पाणी पाझरण्याचे प्रमाण अत्यल्प असते. या खडकाच्या खाली शेकडो वर्षांपूर्वी साठलेले पाणी कूपनलिका खोदून आपण उपसण्यास सुरुवात केली. जेवढे जमिनीतून पाणी उपसतो, तेवढे पाणी पुन्हा जमिनीत शिरतं, मुरत नाही. त्यामुळे जमिनीमध्ये पोकळी निर्माण झाली. ही पोकळी फार मोठी आहे. जमिनीतील पाणी आतून लाव्हा रसाच्या ज्या धडका खाली घन भूस्तराला बसतात, त्यांच्यासाठी शॉक ॲबसॉर्बरचे काम करत असतात. मात्र, पोकळी निर्माण झाल्याने शॉक ॲबसॉर्बर नष्ट पावत आहेत; हे कारण भूकंपावेळी मोठ्या हानीला आपण निर्माण करत आहोत.

त्याचवेळी आपण तलावात जे काही पाणी साठवत असतो, त्या पाण्याचा स्वतःचा जमिनीवर दाब निर्माण होत असतो. या दाबामुळे खालच्या भागात असणारे पाणी भूगर्भात निर्माण झालेल्या पोकळीकडे पूर्वीपेक्षा जास्त वेगाने धावत असते. धरण क्षेत्रात असे पाणी पाझरून आजूबाजूच्या पोकळीत जात असल्याने धरणातील पाण्याचे प्रमाण घटत असते. भूगर्भातील पाणी आपण जितके जास्त वेगाने उपसत जाऊ, तितक्याच वेगाने त्याची जागा घेण्यासाठी पाणी जमिनीत धावते. यामुळे धरणातील पाण्यात घट होते. हे असे पाण्याचे मुरणे किती आहे, याची मोजदाद करता येणे शक्य नसल्याने यावर आज कोणीही फारसे



बोलताना दिसून येत नाही. मात्र, भूगर्भातील घटते पाणी हे दुर्लक्षित राहिलेले महत्त्वाचे कारण बनत आहे.

जागतिक तापमानवाढीने बाष्पीभवनाचा वेग दिवसेंदिवस वाढत चालला आहे. त्यातही धरणाचे पात्र मोठे असेल आणि खोली कमी असेल तर हा वेग आणखी वाढत आहे. त्यामुळेही पाण्याच्या बाष्पीभवनामध्ये मोठी वाढ झाल्याने मोठ्या प्रमाणात पाणी कमी होत आहे. यावर तोडगा काढणे कोणा एका देशाला शक्य नाही. त्यासाठी सर्वच देशांनी मोठ्या प्रमाणात प्रयत्न करणे आवश्यक आहे. मात्र, हव्या त्या वेगाने याबाबत सकारात्मक प्रयत्न होत नसल्याने यावर आपण आपले प्रयत्न करत राहणे एवढेच आपल्या हातात राहते.

पूर्ण क्षमतेने भरलेली धरणे उन्हाळ्यात कोरडी पडण्यामागे आणखी एक महत्त्वाचे कारण आहे. हे कारण अनेकांच्या लक्षात आले आहे. मात्र, ही समस्या दूर करण्यासाठी फारसे प्रयत्न होताना दिसत नाहीत. महाराष्ट्रातील अनेक धरणे गाळाने भरली गेली आहेत, त्यामुळे धरणांचे पात्र उथळ झाले आहे. त्यामुळे धरणाच्या एकूण साठवण क्षमतेइतके पाणी साठतच नाही. पावसाळ्यात धरणाचे दरवाजे उघडले गेले की आपण खूश होतो. मात्र जेवढे साठणे अपेक्षित असते, तितके पाणी साठतच नाही. तरीही तलावाची सुरुवातीची साठवण क्षमता गृहीत धरून सर्व आकडेवारी जाहीर करण्यात येते. त्यामुळे उपयुक्त पाणीसाठा आजही तेवढाच मिळत असला तरी मृत पाणीसाठा वेगाने घटत आहे. त्यामुळे आजूबाजूच्या भूगर्भातील पाणी पातळी झपाट्याने खाली होत असल्याचे लक्षात येते.

याखेरीज सर्वांत महत्त्वाचे कारण म्हणजे तलावांच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या शहरांचा वाढत असणारा विस्तार आणि स्थानिक स्वराज्य संस्थाचे बेफिकीर होणे हे आहे. कोणत्याही तलावातून शहराला होत असणारा पाणीपुरवठा दिवसेंदिवस वाढत आहे. शहराची लोकसंख्या, शहरातील घरे मोठ्या प्रमाणात वाढत आहेत. त्यामुळे प्रत्येकाला पुरेसे पाणी पुरवणे आवश्यक असले तरी स्थानिक स्वराज्य संस्था प्रति माणसी प्रति दिन किती पाणी पुरवले जाते, याचेही भान राखणे आवश्यक आहे. मात्र, हे प्रमाण खूपच वाढले आहे. मात्र, वाढती लोकसंख्या आणि पाणीपुरवठ्याचे अतिरेकी प्रमाण हे तलावातून अतिरिक्त पाणी उपसण्यास कारणीभूत ठरत आहे.

यावर उपाय जनतेनेच करण्याची गरज आहे. आपण अत्यंत जबाबदारीने पाणी वापरण्याची गरज आहे. जमिनीतून पाणी कमीत कमी उपसावला हवे. ऊस, हळद अशी पिके योग्य ठिकाणीच लावायला हवीत. डोंगराच्या टोकावर ऊसासारखी पिके घेण्यासाठी कूपनलिकांचा वापर करून [illegible] शुष्क करत आपण फार मोठ्या संकटाला आमंत्रण देत आहोत. हे टाळायलाच हवे.

vilasshindevs44@gmail.com
संपर्क : ९६०७३...

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 MAY 2024
पुढारी

# शिवाजी विद्यापीठ उन्हाळी सत्रातील ५८८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च-एप्रिल उन्हाळी सत्रातील ५८८ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. मंगळवारी मास्टर ऑफ आर्किटेक्चर, मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन आदी अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळीतपणे झाल्या. दरम्यान, दि. २८ रोजी बी.टेक., एम.कॉम., बीएस्सी.या अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर करण्यात आले. निकालाची सरासरी ८.८९ टक्के आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.